Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उ
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/ए-२/ १२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 617
दिनांक : १०/०२/२०२६

प्रति,

प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषयः- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च-२०२६ च्या तोंडी / प्रात्यक्षिक/ श्रेणी परीक्षेचे साहित्य स्वीकारणेबाबत.....

संदर्भ - राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/१३१ , दिनांक १४/०१/२०२६

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी- मार्च-२०२६ परीक्षेच्या शास्त्र, तंत्र, व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा शुक्रवार दिनांक २३ जानेवारी ,२०२६ ते सोमवार दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्याची **अंतिम दिनांक १८/०२/२०२६** अशी आहे. तरी प्रात्यक्षिक परीक्षचे साहित्य शनिवार **दिनांक २१/०२/२०२६** रोजी **सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत वितरण केंद्रावर आपल्या प्रतिनिधीमार्फत जमा करण्यात करावे. तसेच कोल्हापूर जिल्हयातील कागल,पन्हाळा,गगनबावडा,कोल्हापूर शहर,करवीर व शाहूवाडी यांना शनिवार **दिनांक २१/०२/२०२६** रोजी **सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत मंडळ कार्यालयात जमा करावयाचे आहे. साहित्य जमा करावयास येणाऱ्या आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील जबाबदार व्यक्तिकडे अधिकार पत्र देण्यात यावे.

कोल्हापूर जिल्हयातील कागल,पन्हाळा,गगनबावडा, कोल्हापूर शहर,करवीर व शाहूवाडी या पाच तालुक्याव्यतिरिक्त उर्वरित तालुके व सातारा व सांगली जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्राप्त साहित्य वितरण केंद्रानी प्रचलित पध्दतीने **सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६** रोजी मंडळ प्रतिनिधी यांचे ताब्यात दयावे. **मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सातारा जिल्हा, बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ सांगली जिल्हा व गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ कोल्हापूर** जिल्हयातील वितरण प्रतिनिधीनी समक्ष उपस्थित राहून सदर साहित्य मंडळाकडे जमा करावे.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीसाठी :-**
१) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सांगली / सातारा / कोल्हापूर
३) मुख्याध्यापक/ प्राचार्य, जिल्हा वितरण केंद्रप्रमुख, सांगली / सातारा / कोल्हापूर